डॉ . आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

व्याख्यान

विषय-डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती आणि तिचे सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक फलित

प्रमुख वक्ते – मा.सुधीरजी भगत, निवृत्त उत्पादन शुल्क अधिकारी तसेच कवि, गायक आणि आंबेडकरी विचारवंत

अध्यक्ष – प्रा. डॉ. अविनाश फुलझेले, उपप्राचार्य, डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी,नागपूर

दिनांक आणि वेळ - १३ ऑक्टो. २०२२, सकाळी ९. १५ वा.
स्थळ – मिनी ऑडीटोरीअम, रूम नं. १

- संयोजक -

प्रा.मिलिंदकुमार खेळकर<br>समाजशास्त्र विभाग,<br>डॉ.आं,कॉ,दी,नागपूर

प्रा. राहुल मून<br>डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग,<br>डॉ.आं,कॉ,दी,नागपूर

प्रा.प्रभाकर बडोले<br>अर्थशास्त्र विभाग<br>डॉ.आं,कॉ,दी,नागपूर

# कार्यक्रम अहवाल

## विषय - डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती आणि त्याचे सामाजिक, आर्थिक, व शैक्षणिक फलित

**डॉ आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथील अर्थशास्त्र, समाजशास्त्र ,डॉ आंबेडकर विचारधारा** यांच्या संयुक्त विद्यमाने 13 ऑक्टोंबर 2022 ला सकाळी 9.15 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती आणि तिचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, फलित या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन room no.01 मध्ये घेण्यात आले या कार्यक्रम प्रसंगी मा. प्राचार्याच्या वतीने अध्यक्ष म्हणून डॉ. अविनाश फुलझेले उपप्राचार्य, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर हे लाभले तर मार्गदर्शक म्हणून माननीय सुधीर जी. भगत निवृत्त उत्पादन शुल्क अधिकारी, तसेच कवी, गायक, डॉ आंबेडकरी विचारवंत हे होते तसेच कार्यक्रमाला प्राध्यापक मिलिंद खेडकर विभाग प्रमुख, समाजशास्त्र प्राध्यापक डॉ. राहुल मून विभाग प्रमुख डॉ. आंबेडकर विचारधारा प्रा. प्रभाकर बडोले अर्थशास्त्र विभाग यांची प्रमुख उपस्थिती होती माननीय सुधीर जी भगत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती आणि तिचे सामाजिक, आर्थिक ,शैक्षणिक फलित या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोंबर 1956 ला केलेल्या धम्मक्रांतीचा घटनाक्रम

विद्यार्थ्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केला.
तत्पूर्वी आयोजकांचे त्यांनी अभिनंदन केले. त्यांनी 13 ऑक्टोबर या दिवसाची निवड कार्यक्रमासाठी केली याला फार महत्त्व आहे कारण 13 ऑक्टोबर 1935 याच दिवशी नासिक जिल्ह्यातील येवले या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घोषणा केली होती की **"मी अस्पृश्य म्हणून जन्मलो ते माझ्या हातात नव्हते परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही"** या घटनेला आज **87** वर्षे पूर्ण होत आहेत याचा उल्लेख त्यांनी केला.
पुढे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धम्मक्रांतीचा परिणाम अस्पृश्य समाजावर होऊन  अस्पृश्य समाज बाबासाहेबांनी दिलेल्या शिक्षणाच्या मार्गावर अग्रेसर झाल्यामुळे कशाप्रकारे या समाजात शैक्षणिक परिवर्तन आले हे पूर्वकालीन सद्यस्थितीचे सोदाहरणरण संपूर्ण घटनाक्रम विचारातून मांडला. शिक्षणाच्या परिमाणामुळे कशाप्रकारे आर्थिक प्रगती झाली. हेही त्यांनी मांडले त्याचबरोबर शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीचा परिणाम म्हणून एकूणच अस्पृश्य समाजात सामाजिक  बदल झाला. समाजात अस्पृश्यना मान, सन्मान अधिकार मिळू लागले या वर्गातील बऱ्यापैकी लोक ज्यांनी बाबासाहेबांनी दिलेल्या शिक्षणाच्या मार्गावर चालले त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती होऊन त्यांचा समाजात देश विदेशात मान, सन्मान वाढली परंतु ज्यांनी शिक्षणाकडे पाठ फिरवली ते त्यांची स्थिती आजही हलाखीची व गंभीर आहे म्हणून अजून आपल्या समाजाला मोठा पल्ला गाठायचा आहे त्यासाठी समाजातील प्रत्येक जागरूक युवक युतीने पुढे येऊन समाजाच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक आणि एकूणच सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्नांची परिकाष्ठा केली पाहिजे असे मत माननीय भगत यांनी विद्यार्थ्यापुढे मत मांडले.
**कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अविनाश फुलझेले** यांनी अध्यक्ष मार्गदर्शन करताना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रगती बरोबरच सिम्बॉलिक स्वरूपाची फार मोठी क्रांती आपल्या समाजात झाली जी संविधान लागू होण्यापूर्वी आपल्या समाजाला कायदेशीर अधिकार नव्हते तेव्हा अशा सिम्बॉलिक स्वरूपाच्या क्रांतीची उदाहरणे अपवादात्मक दिसत असत असे मत त्यांनी मांडले याचबरोबर राजकारण, प्रशासन, न्यायपालिका आधीक्षेत्रात सुद्धा आपल्या समाजाने बऱ्यापैकी प्रगती साधली आहे. तरीपण आपल्या प्रगतीचा वेग मात्र फारच मंद आहे त्याला गती येणे व देणे ही आजची काळाची गरज आहे. असे विचार अध्यक्ष मार्गदर्शन करताना **डॉ. अविनाश फुलझेले** सर यांनी व्यक्त केले.
**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग प्रमुख प्रा. राहुल मुन यांनी केले पाहुण्यांचा परिचय समाजशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक मिलिंद खेडकर यांनी केले.**
तर आभार प्रदर्शन **अर्थशास्त्र विभागाचे प्रा. प्रभाकर बडोले** यांनी केले.

**कार्यक्रमाला अर्थशास्त्र विभागाचे डॉ. हरीश बावनगडे डॉ. राजेंद्र तांबे इंग्रजी विभागातील डॉ. भावे मॅडम मराठी विभागातील डॉ रवींद्र रवींद्र तिरपुडे** आणि बी.ए भाग 1,2,3 तसेच एम. ए. भाग 1,2 चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या सफलतेसाठी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेतले. अशाप्रकारे अध्यक्षाच्या परवानगीने कार्यक्रम 10:45 वाजता संपन्न झाला.

















